आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२१ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर रवाना

- स्वच्छता ही सेवा अभियाना अंतर्गत मुंबईत समुद्रकिनारी स्वच्छता मोहिमेत राज्यपाल, मुख्यमंत्र्यांसह लोकप्रतिनिधींचा सहभाग

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर

- हवाई दलाचे नवे प्रमुख म्हणून एअर मार्शल अमर प्रीत सिंग यांची नियुक्ती

**आणि**

- पहिल्या कसोटी सामन्यात भारताचं बांगलादेशासमोर ५१५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यासाठी आज सकाळी रवाना झाले. या दौऱ्यात ते उच्चस्तरीय बैठकीत सहभागी होतील. प्रधानमंत्री आज डेलावेअरमधल्या विल्मिंग्टन इथं होणाऱ्या क्वाड परिषदेत सहभागी होऊन या दौऱ्या सुरुवात करतील. हवामान बदल ते उदयोन्मुख तंत्रज्ञान असे अनेक विषय या परिषदेत चर्चिले जाणार आहेत. क्वाड गटातल्या इतर नेत्यांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. आपण अमिरेकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बेनीज, जपानचे प्रधानमंत्री फुमिओ किशिदा यांच्यासोबत क्वाड परिषदेत सहभागी होण्यासाठी उत्सुक आहोत, असं प्रधानमंत्र्यांनी अमेरिकेला रवाना

होण्याआधीच्या निवेदनात म्हटलं आहे. क्वाड गट हा प्रशांत महासागर प्रदेशात शांतता, प्रगती आणि समृद्धी स्थापित करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या देशांचा समूह असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. आपण भारतीय वंशाच्या नागरिकांना आणि व्यावसायिकांना भेटायला उत्सुक असल्याचंही प्रधामंत्र्यांनी म्हटलं आहे. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी प्रधानमंत्री संयुक्त राष्ट्रांच्या महासभेला संबोधित करतील.

**<><><><><>**

'आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिन' मोहीम आणि 'स्वच्छता ही सेवा' अभियानानिमित्त केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आज जुहू चौपाटी समुद्रकिनारा स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले. भू -विज्ञान मंत्रालय आणि राज्य सरकारच्या सहयोगानं या मोहिमेचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार रविंद्र वायकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर उपस्थित होते. 'स्वच्छता ही सेवा २०२४' हा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान राबवली जात आहे.

स्वच्छता अभियानासाठी विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त करून तरुणांमध्ये स्वच्छतेबाबत होत असलेली जागृती ही सकारात्मक बाब असल्याचं राज्यपाल यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली. राज्याला ७२० किलोमीटर लांबीचे नैसर्गिक सौंदर्य लाभलेले अनेक समुद्रकिनारे लाभले आहेत. जगभरातले पर्यटक देखील स्वच्छ किनाऱ्यांना पसंती देतात. हे किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली प्रत्येकाची आहे असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

पालघरमध्येही वसई विरार शहर महानगरपालिकेकडून जिल्ह्यातल्या राजोडी समुद्रकिनाऱ्यावर बीच क्लिनअप ड्राईव्हचं आयोजन करण्यात आलं होत. या बीच क्लिनअप ड्राईव्ह मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान, विद्यार्थी, विविध संस्था, बचत गटांच्या महिला, नागरिक हजारोंच्या संख्येनं सहभागी झाले होते.

<><><><><>

राज्यातल्या खासगी विनाअनुदानित आयुर्वेद, होमिओपॅथी तसंच युनानी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात संस्थात्मक कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांकडून पाच पट शैक्षणिक शुल्क आकारण्याचा निर्णय सरकारनं तात्काळ स्थगित करावा अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. महायुती सरकारच्या या निर्णयामुळे विद्यार्थी-पालकांवर १५ लाख रुपयांचा अतिरिक्त शुल्काचा भार पडला आहे. संस्थांना होणाऱ्या लाभाची ही एकूण रक्कम सुमारे १६५ कोटी रुपये एवढी आहे. हा निर्णय तात्काळ स्थगित करून याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

<><><><><>

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीने त्यांच्या उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी विधानसभेच्या ११ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने नागपूर दक्षिण पश्चिम, छत्रपती संभाजीनगर पूर्व, नांदेड दक्षिण, रावेर, सिंदखेडराजा, खानापूर आदी जागांचा समावेश आहे.

**<><><><>**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आज बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. जिल्ह्यात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले असून पाच पेक्षा अधिक व्यक्तींना एका ठिकाणी थांबता येणार नाहीय. मागील पाच दिवसांपासून मनोज जरांगे यांचं अंतरवाली सराटीत बेमुदत उपोषण सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सगे सोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी केली जावी, हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागू करावं, अंतरवाली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्यावेळी मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेतले जावेत, अशा मागण्या जरांगे पाटील यांनी केल्या आहेत.

**<><><><>**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष भरत गोगावले यांना मंत्रीपदाचा दर्जा देण्यात आला आहे. गोगावले जोपर्यंत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदावर राहतील, तोपर्यंत त्यांना मंत्रीपदाचा दर्जा देण्यात येत असल्याचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे.

**<><><><>**

हवाई दलाचे प्रमुख म्हणून एअर मार्शल अमर प्रीत सिंग यांची नियुक्ती झाली आहे. सिंग हे सध्या हवाई दलाचे उप प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. येत्या ३० तारखेला सिंग हे विद्यमान एअर चीफ मार्शल विवेक चौधरी यांच्याकडून हवाई दल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारतील. सिंग यांनी त्यांच्या ४० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत विविध कमांडसाठी, निर्देशक तसंच परदेशी नियुक्तींसाठी काम केलं आहे. त्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, संरक्षण सेवा कर्मचारी महाविद्यालय आणि राष्ट्रीय संरक्षण

महाविद्यालयातून शिक्षण घेतलं असून त्यांना ५ हजार तासांपेक्षा जास्त उड्डाणांचा अनुभव आहे.

**<><><><><>**

आम आदमी पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या आतिशी आज दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. दिल्लीत राज निवास इथं नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आतिशी यांची दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती केली आहे. राष्ट्रपतींनी पाच मंत्र्यांच्या नियुक्तीलाही मंजुरी दिली आहे. यात गोपाल राय, कैलाश गेहलोत, सौरभ भारद्वाज, इम्रान हुसैन आणि मुकेश अहलावत यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जम्मू काश्मीरमध्ये अभूतपूर्व बदल झाला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. जम्मू काश्मीरमधल्या पूँछ जिल्ह्यातल्या मेंधर इथल्या प्रचासरभेत ते बोलत होते. या काळात केंद्रशासीत प्रदेश दहशतवादापासून शांततेकडे झुकल्याचं त्यांनी सांगितलं. इथल्या लोकशाहीला तीन कुटुंबांनी वेठीस धरलं होतं, पण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार आल्यानंतर तळागाळातल्या लोकशाहीचा मार्ग खुला झाला, असं शहा म्हणाले.
दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी तसंच नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि जम्मू काश्मिरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्या सभा सोमवारी होणार आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा २४ सप्टेंबरपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी ते नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर

इथं भाजपा पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार असल्याचं भाजपाच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. दुसऱ्या दिवशी ते नाशिक आणि कोल्हापूरला भेट देतील.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या पक्षाला घड्याळ्याच्या ऐवजी नवीन चिन्ह द्यावं, अशी मागणी शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात केली आहे. घड्याळ हे मूळ राष्ट्रवादी काँग्रेसचं पक्षचिन्ह आहे. पण आता पक्ष कोणाचा हा मुद्दा न्यायालयात प्रलंबित आहे. त्यावेळी आम्हाला तुतारी हे नवीन चिन्ह दिलं त्याचप्रमाणे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही नवीन चिन्ह द्यावं, अशी मागणी या याचिकेत केल्याचं खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. यापूर्वीही अनेकदा ही मागणी केल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात आजच्या तिसऱ्या दिवशी भारतानं भारतानं दुसऱ्या डावात ४ गड्यांच्या मोबदल्यात २८७ धावा केल्या आणि बांगलादेशसमोर जिंकण्यासाठी ५१५ धावांचं मोठं लक्ष्य ठेवलं. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात पहिल्या डावात भारतानं ३७६ धावा केल्या होत्या, तर बांगलादेशचा पहिला डाव १४९ धावांवर आटोपला होता. भारताच्या दुसऱ्या डावात शुभमन गिलनं ११९ तर रिषभ पंतनं १०९ धावांची धडाकेबाज खेळी केली. या सामन्यात जसप्रीत बुमराहनं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० बळींचा टप्पा पार केला. सामन्याचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दुसऱ्या डावात बांगलादेशच्या १ बाद ८५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

हंगेरीच्या बुडापेस्ट इथं सुरू असलेल्या बुद्धिबळ ऑलिंपियाड स्पर्धेत भारताच्या पुरुष संघाने काल गतविजेत्या उझबेकिस्तानसोबतचा सामना बरोबरीत सोडवला. या संघात डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद, अर्जुन एरिगसी आणि विदित गुजराथी या खेळाडूंचा समावेश आहे. या सामन्यानंतर पुरुषांचा संघ पदकतालिकेत आघाडीवर राहिला. महिला संघानेही अमेरिकेच्या संघाविरोधातला सामना २-२ अशा बरोबरीत सोडवला.

**<><><><><>**

येत्या काही दिवसांत देशातल्या काही भागात जोरदार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. मध्य महाराष्ट्र, **कोकण आणि गोव्यात** जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पूर्व मध्य प्रदेश आणि विदर्भातही या काळात जोरदार पावसाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**